'' विवेक, ज्ञान अमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण ''

डॉ.म.पं.सुरवसे

श्रीकृष्ण बहुउद्देशिय समाजसेवी संस्था उस्मानाबाद संचलित,

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद



## माहिती पत्रक

एन.सी.टी.ई.कोड नंबर - १२३२५५

महाराष्ट्र शासन मान्यता क्र. - ४६१५/३३२(४)


मो.नं.-७८७५६६९८५९ / ९४२२१६३५५५

Web Site - www.shrikrishnaosbd.org

E - mail skbssoedu@gmail.com



Activate Windows
Go to Settings to activate Windows.

# प्रेरणास्थान



## डॉ.मगन पं. सुरवसे

( M.A.,M.Ed.,M.Phil.,Ph.D)

संस्थापक – श्रीकृष्ण ब. स. संस्था,उस्मानाबाद

माजी डीन – शिक्षणशास्त्र विद्याशाखा डॉ.बा.आं.म. विद्यापीठ औरंगाबाद

'' विवेक, ज्ञान अमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण ''

डॉ.म.पं.सुरवसे

## उद्दिष्टे -

१) शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक पिढीला भविष्याच्या दृष्टीने दळणवळणाच्या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे दर्जेदार व्यावसायिक, तांत्रिक प्रशिक्षण देणे व शिक्षक प्रशिक्षकामध्ये संशोधनात्मकदृष्टी निर्माण करणे.

२) शिक्षक प्रशिक्षणातील मुलभूत संकल्पनांचा परिचय करून देऊन प्रशिक्षणाचा पाया मजबूत करणे.

३) ग्रामीण भाग व शहरी भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

४) गुणवत्तापूर्ण शिक्षक–प्रशिक्षण देणे.

## ❊ श्रीकृष्ण बहुउद्देशिय समाजसेवी संस्थेची ओळख ❊

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. अशा या युगात ग्रामिण व शहरी  भागातील विद्यार्थी कोठेही कमी पडू नये या विचारातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून इ.स.२००४ मध्ये शिक्षणाची जाण असणारे डॉ.म.पं.सुरवसे यांच्या बहुमोल अथक परिश्रमाने ''विवेक, ज्ञानअमृत व मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण '' या ध्येयाने प्रेरित होऊन श्री कृष्ण बहुउद्देशिय समाजसेवी संस्थेची स्थापना झाली. शिक्षक प्रशिक्षणाच्या दृष्टीने उस्मानाबाद येथे शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू केले. प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक व शिक्षकेतर असे कर्मचारी कार्यरत आहेत. मानवी व भौतिक सुविधा अद्ययावत केल्या आहेत. अर्हताप्राप्त अनुभवी प्राचार्य, कौशल्ययुक्त सहाय्यक प्राध्यापक व कर्मचारी, सुसज्ज प्रयोगशाळा, समृध्द ग्रंथालय,मोठे खेळाचे मैदान, एन.सी.टी.ई. च्या निकषानुसार भव्य इमारत, प्रशिक्षणाचा गुणवत्तापूर्ण दर्जा ही संस्थेची वैशिष्टये आहेत.

Activate Windows
Go to Settings to activate Windows.

## ❋ निकालाची उज्वल परंपरा सन २०२२-२३

शिंदे स्वरांगी



८८.७%
कॉलेज प्रथम

गायकवाड सारिका



८७.१%
कॉलेज द्वितीय

उंडे सुनिता



८१.१%
कॉलेज तृतीय

## ❋ विद्यार्थी प्रवेश क्षमता

१) प्रथम वर्ष -५०  २) द्वितीय वर्ष - ५०

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

**१) संगणक कक्ष-** प्राध्यापक व विद्यार्थ्यासाठी संगणक कक्ष उपलब्ध असून त्यामध्ये १० संगणक संच,इंटरनेट व प्रशस्त बैठक व्यवस्था उपलब्ध आहे.

**२) मानसशास्त्र प्रयोगशाळा -** मानसशास्त्र प्रयोगशाळेत आवश्यक सर्व चाचण्या व कसोट्यासह अद्ययावत साहित्य उपलब्ध.

**३) विज्ञान प्रयोगशाळा -** जीवशास्त्र,भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र, विषयानुसार प्रयोगासाठी लागणारे साहित्य उपलब्ध

**४) ग्रंथालय -** विद्यार्थी व प्राध्यापकासाठी आवश्यक असणारी अभ्यासविषयक क्रमिक पुस्तके, संदर्भ साहित्य एकूण ग्रंथसंख्या असून नियत कालिके व वर्तमानपत्रे, रिसर्च जर्नल्स, मॅगझिन व विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र रिडिंग रूमची सोय उपलब्ध आहे.

**५) क्रिडांगण -** व्हॉलीबॉल,कबड्डी,खो-खो, क्रिकेट,उंच उडी व लांबउडीचे क्रीडांगण खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.

**६) सांस्कृतिक सभागृह -** विविध सांस्कृतिक कार्यक्रमासाठी भव्य सभागृह उपलब्ध आहे.

**७) विविध उपक्रम** - महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा यासाठी विविध उपक्रमाची राबवणूक केली जाते. समाजसेवा शिबीर, मान्यवराची व्याख्याने, विशेष प्रशिक्षण, पर्यावरण संरक्षण-विषयक उपक्रम, सामाजिक समस्येवर आधारित उपक्रम, विविध गुणदर्शन कार्यक्रम इ.

**८) शैक्षणिक वर्ष २००८ - ०९ ते आता पर्यंत उज्वल निकालाची परंपरा**

## ⁕ शिस्तीसंबंधी सर्वसाधारण नियम ⁕

१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये वेळेवर व गणवेशामध्ये यावे.

२) महाविद्यालयाच्या आवारात, वर्गात शिस्त व शांतता पाळावी.

३) विद्यापीठाच्या नियमानुसार नियमित हजेरी असावी.

४) प्रत्येक विद्यार्थ्याने काच फलकातील सूचना वेळोवेळी वाचाव्यात. सूचना न वाचल्याने होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालयाचे प्रशासन जबाबदार राहणार नाही.

५) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.


६) महाविद्यालयाची इमारत, फर्नीचर, ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, शैक्षणिक साहित्याची मोडतोड केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

७) प्राचार्यांच्या तसेच प्राध्यापकांच्या पूर्व परवानगी शिवाय पालकांना किंवा नातेवाईकांना महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांना भेटता येणार नाही.

८) महाविद्यालयाच्या आवारात भ्रमणध्वनीस बंदी राहील,अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल.

९) शिस्तीसंबंधी प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

Activate Windows
Go to Settings to activate Windows.




# प्राचार्य मनोगत

अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक – शिक्षण कार्यक्रमाचा दर्जा समृध्द बनविण्याची नितांत गरज आहे. शिक्षणाचा दर्जादेखील समृध्द बनविण्याची गरज आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापन हे परिपूर्ण व परिणामकारक झाले पाहिजे. अध्यापन कार्यक्रम परिणामकारक बनविणे हे एन.सी.टी.ई.च्या अनेक उद्दिष्टांपैकी एक प्रमुख उद्दिष्ट आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, हक्क व कर्तव्याची जाणीव, सामाजिक बांधिलकी, दर्जेदार संशोधन, सद्‌सद विवेकबुध्दी, देशप्रेम, विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होईल.

भावी शिक्षकांबद्दल आपले स्वप्न की २०२० साली भारताला जगातील महासत्ता बनवायचे आहे. यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना जागतिक स्तरावर टिकून राहण्यासाठी आधुनिक अध्यापन कौशल्याचे ज्ञान देवून त्यांना सक्षम बनविण्याची गरज आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षक प्रशिक्षकाने आधुनिक अध्यापन कौशल्यात पारंगत बनले पाहिजे. मुल्याधिष्ठित आचरण ठेवून भावी शिक्षकांना मूल्य शिक्षणाचे धडे दिले पाहिजेत. सर्वच क्षेत्रात योग्य बदलासाठी वैज्ञानिक दृष्टीने उपाय योजले पाहिजेत.

शिक्षक प्रशिक्षणाच्या संधीचा उत्कृष्ठ नमुना म्हणजे कॉलेज ऑफ एज्युकेशन उस्मानाबाद होय. आमच्या महाविद्यालयाचा आज वेगळा ठसा आहे. याचे श्रेय संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य,सहाय्यक प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, प्रशिक्षणार्थी व पालकांना आहे. संस्था व त्यातील घटक यांच्यात योग्य समन्वय होऊन टीमवर्कने निर्भयपणे शैक्षणिक कार्यात झोकून दिले पाहिजे. यासाठी सर्व घटकात मैत्रीपूर्ण वातावरण हवे. राष्ट्राचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षक समृध्द,सक्षम असला पाहिजे. शिक्षक प्रशिक्षणाद्वारे असा शिक्षक घडविण्याचे कार्य चालते. आमचे प्रशिक्षणार्थी व्यक्तिगत, सामाजिक, व्यावसायिक जीवनात उत्तम जबाबदाऱ्या पार पाडून आदर्श विश्वनागरिक बनतील अशी अपेक्षा करतो.

**प्राचार्य डॉ.गणपूर एस.एस.**
एम.ए,एम.एड्,पीएच.डी



## प्राचार्य डॉ.गणपूर एस.एस.

एम.ए,एम.एड् ,डी.सी.ए, पीएच.डी
कॉलेज ऑफ एज्यूकेशन, उस्मानावाद
मो.नं-७८७५६६९८५९



## डॉ.सूरवसे आर.एम.

एम.ए,एम.एड्,नेट,पीएच.डी
मो.नं-९४२११६३५५५



## डॉ.पवार डी.डी.

एम.ए,एम.एड्,सेट, पीएच.डी
मो.नं-९६५७७९४३४३



स्वच्छता अभियानातंर्गत परिसर स्वच्छ करताना



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी
प्राचार्य कॅप्टन बी.बी.बागल

Activate Windows
Go to Settings to activate Windows.





Book-Post

Mr./Miss.________________________________

________________________________

________________________________

**कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद**

ता.जि. उस्मानाबाद – ४१३५०१

श्री स्वामी समर्थ ऑफसेट, माढा